सुविचार हे सकारात्मक विचारांचे उदाहरण आहेत आणि ते आपल्याला जीवनात योग्य दिशा दर्शवतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १४ मे २०२५ | अंक १५२ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# दहावीचा निकाल ९४.१० टक्के : उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्र्यांकडून अभिनंदन

## यशस्वी विद्यार्थ्यांनी भविष्यातही यशाची शिखरे पादाक्रांत करावीत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या शुभेच्छा

मुंबई दि. १३ : दहावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिशा ठरविणारा महत्त्वाचा टप्पा असतो. या टप्प्यावर यश मिळविलेले विद्यार्थी कौतुकास पात्र आहेत, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी परीक्षेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून विद्यार्थ्यांनी भविष्यातही यशाची शिखरे पादाक्रांत करावीत, अशा शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले. राज्यात एकूण ९४.१० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून परीक्षेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले आहे. तर उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊन यश संपादन करावे, असे आवाहन केले आहे.

### मुलींची आघाडी

सर्व विभागीय मंडळातून नियमित उत्तीर्ण मुलींची टक्केवारी ९६.१४ इतकी असून मुलांची टक्केवारी ९२.३१ इतकी आहे. मुलींच्या निकालाची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८३ टक्क्यांनी जास्त आहे.



दहावीच्या एकूण २४ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर २३ हजार ४८९ शाळांपैकी ७९२४ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. नियमित विद्यार्थ्यांपैकी ४ लाख



८८ हजार ७४५ विद्यार्थी प्रविण्यासह प्रथम श्रेणीत तर ४ लाख ९७ हजार २७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षणमंत्र्यांनी कौतुक केले आहे.

### दिव्यांग विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण उल्लेखनीय

नऊ विभागीय मंडळांमधून एकूण ९,६७३ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९,५८५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यातील ८,८४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांच्या निकालाची टक्केवारी ९२.२७ अशी उल्लेखनीय आहे. या विद्यार्थ्यांचेही श्री. भुसे यांनी अभिनंदन केले आहे

### उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या

दहावीच्या परीक्षेत नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५ लाख ५८ हजार ०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ लाख ४६ हजार ५७९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची ही टक्केवारी ९४.१० अशी आहे

### विभागीय मंडळनिहाय उत्तीर्ण विद्यार्थी

राज्यातील सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजेच ९८.८२ टक्के इतका असून नागपूर विभागाचा निकाल सर्वात कमी म्हणजे ९०.७८ टक्के इतका आहे. या व्यतिरिक्त पुणे विभागात ९४.८१, छत्रपती संभाजीनगर विभागात ९२.८२, मुंबई विभागात ९५.८४, कोल्हापूर विभागात ९६.८७, अमरावती विभागात ९२.९५, नाशिक विभागात ९३.०४ आणि लातूर विभागात ९२.७७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती मंडळामार्फत देण्यात आली आहे.

# आदर्श देवगाव प्रीमियर लीग प्रथम पारितोषिक स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी,द्वितीय पारितोषिकचे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स, प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण,

वडवणी प्रतिनिधी अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील आदर्श देवगांव या ठिकाणी गेल्या काही दिवसांपूर्वी क्रिकेट प्रीमियर लीगच्या स्पर्धा चालू होत्या प्रीमियर लीग आज मेगा फायनल match स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी vs महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांच्या मध्ये झाला व स्वराज्य क्रिकेट क्लब यांनी यामध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.प्रथम पारितोषिक परडी माटेगाव सरपंच माधव काका शेंडगे व माऊली दादा सुरवसे यांच्या संयुक्त विध्यमाने(33333) देण्यात आले तसेच द्वितीय पारितोषिक चे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांना मिळाले .द्वितीय पारितोषिक शेतकरी नेते जगदीश काका फरताडे यांच्या वतीने (17777)देण्यात आले तसेच लीग चे तिसरे पारितोषिक आदर्श क्रिकेट क्लब यांना देण्यात आले .त्याचे मानकरी उपसरपंच महादेव अण्णा सुरवसे यांच्या वतीने( 11111) देण्यात आले व बेस्ट बॉलर म्हणून पर्पेल कॅप सखाराम सुरवसे यांना देण्यात आली .पार्पेल कॅप चे मानकरी ग्रा.प.सदस्य गणेश निवृती गवळी यांच्या वतीने (2500)




देण्यात आले त्याच बरोबर orange कॅप (बेस्ट बॅट्समन ) हा पुरस्कार राहुल पवार यांना देण्यात आला.याचे मानकरी दिनकर भैय्या सुरवसे यांच्या देण्यात (2500) देण्यात आला व man ऑफ the serise दिनेश पैठेने यांना देण्यात आला त्याचे मानकरी नक्ष मारोती सुरवसे यांच्या वतीने(3100) देण्यात आला आणी टूर्नामेंट ऑफ the प्लेयर म्हणून शिकंदर शेख यांना देण्यात आला त्याचे मानकरी आमच्या गावचे सरपंच मुकुंद भैय्या सुरवसे यांच्या वतीने (3100) देण्यात आले व या लीग साठी गवळी सर यांच्या कडून मोफत पाणी पुरवण्यात आले (12) दिवस व लीग साठी लागलेले सर्व बॉल ह.भ.प.मछिंद्र महाराज गवळी व ह.भ.प. गोविंद महाराज सुरवसे यांच्या वतीने तब्बल( 120) बॉल देण्यात आले आणी विशेष सहकार्य म्हणून dr. संदीपान सुरवसे,उत्तम बप्पा सुरवसे ,इंजिनियर परशु आबा सुरवसे ,लाईनमेन् साहेब दादा जाधव,दत्ता पाटील सुरवसे,विकास गिरगुणे,सखाराम सुरवसे,महेश सुरवसे,विलास गवळी,जोतिराम इतापुरे ,बाबासाहेब आबा सुरवसे,तसेच कमिटी यांनी अतिशय अनमोल असे सहकार्य केले , क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी सर्कलमधील तरुणांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते



बीड जिल्ह्यात काल झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, तसेच बीड तालुक्यातील शिदोड येथे असणाऱ्या जस्विक पोल्ट्री फार्म चे वादळी तडाख्यात प्रचंड नुकसान झाले. यात पत्रे उडाली, अंड्याचे नुकसान झाले, काही कोंबड्या दगावल्या आहेत. या फार्म ची पाहणी करतांना शिवसेनेचे जिह्लाप्रमुख उह्लास गिराम, फार्म चे चालक संजय नरवडे, पंकज कुटे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश थोरात.

# मराठा सेवा संघ मुलींचे वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा समाजातील गरीब व होतकरू मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टिकोनातून समाजातील दानशुर व्यक्तींच्या मदतीने वसतिगृह तीन वर्षांपासून सुरू झालेले आहे. इयत्ता दहावी पुढील शिक्षण व उच्चशिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील गरजु मुलींनी प्रवेश अर्ज भरावा असे आवाहन मराठा सेवा संघ नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे. या काही दिवसांत दहावी नंतर मराठा मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. नांदेड हे राज्यात प्रथम क्रमांकाचा शिक्षणाचे केंद्र झाले आहे या सर्व बाबींची जाण ठेवुन मराठा सेवा संघाने जुन २०२२ पासुन नवा मोंढा नांदेड येथे मुलींचे वसतिगृह ना नफा ना तोटा तत्वावर चालु केले आहे या ठिकाणी प्रवेशासाठी एकुण अर्जापैकी ज्या विद्यार्थीनींना दहावीत जास्त गुण आहेत तसेच




शिकण्याची जिद्द आहे पण परिस्थिती नाजुक आहे अशांनाच याठिकाणी प्रवेश मिळणार आहे.वसतिगृहात प्रवेशासाठी खालील साईटवर अर्ज करावा https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdxjFV2SvVUJWk9I0E_wQHt-bNOdIqp7UPNr-trx6IPC8cXXw/viewform?usp=header प्रवेश अर्ज करण्यासाठी काही तांत्रिक अडचण भासल्यास 9422170620 या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन नांदेड मराठा सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कै.गोविंदराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : इयत्ता १० वी बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून, प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कै. गोविंदराव पाटील सिरसाट शिक्षण प्रसारक मंडळ उमरा द्वारा संचलित येळी तालुका लोहा येथील कै.गोविंदराव पाटील माध्यमिक विद्यालयाने आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.या विद्यालयाचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीचा ९० टक्के निकाल लागल्याने यशवंत विद्यार्थ्यांचे व शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. इयत्ता दहावीतील शुभांगी काशिनाथ ढगे हिने ८९.२० टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला.कीर्ती मारोती ढगे हिने ८९.२० टक्के गुण मिळवून दुसरा, तर सुप्रिया भागवत शिंदे हिने ८३.२० टक्के गुण घेऊन



DHAGE SHUBHANGI 89.20% | DHAGE KIRTI 89.20% | SHINDE SUPRIYA 83.20%

तृतीय क्रमांक पटकावला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव तथा मुख्याध्यापक गणेश मोहनराव सिरसाट तसेच शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन केले जात आहे.

# पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण बाधित होणार असल्याने वनविभागाला गायरान जमिन देण्यास महाजनवाडीकरांचा विरोध :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश :- ( दि.१३) बीड तालुक्यातील महाजनवाडी ग्रामपंचायत अंतर्गत २५ वर्षांपासून झाडे लाऊन जोपासलेली व संपूर्ण गावाची पाणीपुरवठा योजना व सामाजिक वनीकरण क्षेत्र बाधित होणार असल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी काळु नदीवरील नियोजित प्रकल्पांमधील वन जमिनीच्या बदल्यात बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील ४० हेक्टर जमिन वनविभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश काढले असुन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तशा हालचाली सुरू केल्या असुन महाजनवाडी ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव घेऊन विरोध दर्शविला असुन तसे जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असुन गावकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी,माजी सरपंच दत्ता घरत, तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे व ग्रामस्थांनी सांगितले आहे.ग्रामपंचायतचा संमतीदर्शक ठराव नाही आणि सामाजिक वनीकरण बाधित होणार, जिल्हाधिका-यांना लेखी तक्रार :- विश्वंभर गिरी ( सरपंच महाजनवाडी)---महसूल व वनविभाग शासन परिपत्रक दि.२८.०५.२०१० अन्वये ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत.त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापुर्वी ग्रामसभेचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी असे नमूद केले आहे. ग्रामपंचायतने तसा कोणताही संमतीदर्शक ठराव दिलेला नाही. गावाने २५ वर्षांपासून कोणतेही अतिक्रमण न होऊ देता झाडांची लागवड करून जोपासल्याने सामाजिक वनीकरण विभागाकडून २ वेळेस राज्यस्तरीय पुरस्कार गावाला मिळाले आहेत. गेल्यावर्षी सामाजिक वनीकरण




विभागामार्फत ३० हजार झाडांची लागवड केली असुन पुढच्या वर्षी ते ग्रामपंचायतीच्या ताब्यात मिळणार आहे. ग्रामस्थांनी बैठकीत एकमुखाने वनविभागाच्या ताब्यात जमीन देण्यास विरोध केला असुन दि.२३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने लेखी निवेदन दिले असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

गावचा पाणीपुरवठा बाधित होऊन गावकरी पाण्यावाचुन तडफडतील :- दत्ता जाधव (माजी सरपंच ) गावची लोकसंख्या २५०० च्या आसपास असुन गाव आणि वस्त्यांना पाणी पोहोच करणा-या ग्रामीण पाणीपुरवठा करणाऱ्या २ विहिरी,जलयोजना याच गायरान जमिनीवर आहेत. तसेच ४ बोअरवेल तसेच गावाच्या पाणीपुरवठा विहिरीच्या वरच्या बाजूला पाझर तलाव घेतलेला आहे. तसेच आजुबाजुच्या कोंबडवस्ती,तुकाई वस्ती यांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले असुन वनविभागाच्या ताब्यात जमीन दिल्यास भविष्यात वनविभागाचे नियम पाहता ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार असल्याने ग्रामस्थांचा याला विरोध असल्याचे माजी सरपंच दत्ता घरत यांनी सांगितले. वनविभागाच्या ताब्यात जमिन गेल्यास रस्त्याची अडचण येणार :- बाबुराव जगदाळे ( तंटामुक्ती अध्यक्ष महाजनवाडी)

मांजरसुंभा ते पाटोदा रस्त्यावरून महाजनवाडी बोरखेड कडे जाणारा मुख्य रस्ता वनविभागाच्या ताब्यात गेल्यास भविष्यात रस्ता दुरुस्ती व ईतर कामांची अडचण होईल.कारण आमच्या गावाशेजारील फुकेवाडी येथील गेल्या कित्येक वर्षानंतर मंजुर झालेला डांबरीकरण रस्ता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी अठवल्याने ठेकेदार यांनी अर्धवट रस्ता करून काम सोडून दिले. फुकेवाडी ग्रामस्थांनी वारंवार निवेदने ,आंदोलने करूनही काही उपयोग झाला नाही. भविष्यात तीच वेळ आमच्यावर येऊ शकते त्यामुळे ग्रामस्थांचा विरोध असल्याचे तंटामुक्ती अध्यक्ष बाबुराव जगदाळे यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १४ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# आदर्श विवाह काळाची गरज

विवाह सोहळा म्हणजे प्रत्येकाच्या जीवनातील खूप महत्वाचा मंगलसोहळा असतो. जीवनसाथीदारासोबत जीवनभर सहविचाराने एकमेकांच्या सुख-दुःखात वाटेकरी होऊन सुखमय जीवन जगण्यासाठी खडतर वाटेने मार्गक्रमण करीत आदर्श जीवन जगत, अनेक तडजोडी करीत कौटुंबिक, सामाजिक बांधिलकी जपत संसारीक प्रपंचात मार्गक्रमण करीत असतो. आई-वडील व समाजाकडून प्राप्त झालेल्या संस्काराच्या छत्रछायेत जीवनाच्या दिशा ठरव आपण आपल्या स्वप्न व ध्येयाच्या शिखरापर्यंत पोहचण्यासाठी विविध प्रकारच्या धडपडी करीत असतो. असे जरी असले तरी अलिकडच्या काळात विवाह सोहळ्यात विविध चुकीच्या प्रथा पध्दतींचा अवलंब केला जात आहे. वारेमाप पैसा या प्रसंगी खर्च केला जात आहे. यातून सुशिक्षित समजला जाणारा समाज भरकटला जात आहे. विवाह प्रसंगी पारंपारीक कमी खर्चाच्या वाद्या ऐवजी लाखो रुपयांच्या डीजे सारख्या ध्वनिप्रदूषणकारी वाद्यामुळे होणाऱ्या विपरीत परिणामांची जाणीव असताना देखील तरुणाईकडून या वाद्याला मोठी पसंती आहे. भविष्यात याचे दुष्परिणाम होताना आपल्याला दिसतीलही. परंतु ती विनाशकारी वेळ येण्यापूर्वी कुठेतरी आत्मचिंतन करुन या चुकीच्या प्रथा व पध्दतींचा विवाह सोहळ्यातून नायनाट करणे सर्वांच्या हिताचे ठरणार आहे. याकरीता तरुणाईने पुढाकार घेतल्यास अधिक संयुक्त ठरु शकेल. यासाठी आदर्श विवाह पध्दत स्वीकारणे गरजेचे आहे.

विवाह सोहळ्यातील अवास्तव खर्च होणारे प्रकार व प्रथा थांबविणे वेळेवर लग्न न लागणे त्यामुळे लग्न सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जनतेला मनस्ताप होणे, नवीन हळद प्रथा, डीजे वाद्य यासारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी स्वतः वधू-वर यांसह त्यांच्या घरच्यांनी सुरुवात केली तर नक्कीच समाजात सकारात्मकता निर्माण होऊ शकते. काही धनाढ्य श्रीमंत मंडळी आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन दाखविण्यासाठी नवनवीन तसेच पाश्चिमात्य संस्कृतींच्या झगमगाटाचा स्वीकार करतात आणि त्याचा हेवा काही अतिसुधारीताना वाटतो. पर्यायाने हे वारं सामान्य माणसापर्यंत पोहचत असतं. सामाजिक प्रतिष्ठेसाठी जवळ पैसा नसला तरी बरीच वधू-वरांचे वडिलधारी कर्जबाजारी होऊन आपल्या इभ्रतीसाठी छातीवर दगड ठेवतात व आपल्या मुला-मुलीच्या आनंद व सुखासाठी न पटणारे निर्णय व प्रथांना बळी पडत असतात. जेवढे आपण आधुनिकतेकडे जात आहोत तेवढ्याच प्रमाणात अडचणी सुध्दा निर्माण होत आहे. शिक्षणाचे वाढते प्रमाण बघता विवाह ठरण्यापूर्वी मुला-मुलीच्या कुंडलीसह त्यांचे गुण-दोष तपासले जातात. कुंडली, गुण-दोष जुळवून विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर देखील त्यांच्यात वाद-विवाद होऊन अक्षरशः घटस्फोट होण्याची कोर्टात अनेक प्रकरणे सुरु आहेतच.

बँड डीजेमध्ये वाजा वाजवणा-यांच्या वाद्याच्या ठेक्यावर मुलं-मुली, पुरुष- एव्हाना महिलांचे नाचणे फारच विदारक व चुकीचे वाटते. परंतु तरुणाईला ते चांगले वाटते ही शोकांतिका आहे.

तीन-चार वर्षांपासून प्रिवेडिंग म्हणजे लग्नाच्या पूर्वीच लग्न ठरलेला मुला-मुलीसह शुटिंग व फोटोग्राफर दुसरीकडे निसर्गरम्य प्रेक्षणीय ठिकाणी काही दिवस जाऊन शुटिंग फोटोग्राफी करतात. या प्रकार नको ते देखील प्रकार घडून नंतर ठरलेले लग्न रद्द होण्याच्या घटना सुध्दा घडल्या आहेत. एवढेच नव्हे तर नको त्या प्रसंगाची व्हिडिओ शुटिंग वा फोटो काढून समाजात बदनामी होण्याच्या घटना घडल्या असल्याने प्रिवेडिंग प्रकाराला मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे. तरी देखील ते सुरुच असल्याचे जाणवते.

गेल्या वर्षापासून वधू-वराला लावण्यात येणारी हळद या प्रथेत देखील ब-याच नवनवीन पध्दतींचा समावेश झाला आहे. त्या रात्री डीजेच्या तालावर बारा वाजेपर्यंत वा त्यापेक्षा अधिक वेळ नाचगाणे सुरु असता. सदर वाद्याच्या ध्वनिप्रदूषणामुळे वाजूबाजूच्या नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा कोणीही समजूतदार वर्ग विचार करीत नाही. डीजेच्या अतिकर्कश आवाजासह होणाऱ्या कंपनामुळे घरातील वस्तूंची पडझळ होणे, हृदयविकाराचे झटके येऊन मृत्यू होण्याच्या घटना घडल्या आहे. डीजे मालकांना डीजे आवाजाबाबत निर्देश असताना देखील त्यांच्या पायमल्ली होत असते. अशा प्रकारे मर्यादेपेक्षा डीजेचा आवाज करणाऱ्या डीजे मालकांवरच कडक कार्यवाही करणे गरजे आहे.

लग्नसोहळा म्हटला म्हणजे दारु हे समीकरण ठरलेले मग तो सोहळा श्रीमंताच्या घरचा असो वा गरीबाच्या. दारु शिवाय सोहळ्यात रंग चढत नाही. परिणाम लहान बालकांवर याचा मोठा विपरीत परिणाम होताना जाणवतो. यातून काहींचा दारुकडे नव्याने चंचू प्रवेश होत असतो.

लग्नात होणारा वारेमाप खर्च थांबवून तोच संसारासाठी उपयोगी आणता येऊ शकतो. बिगरमोसमी वादळी पावसाने, दिवस-रात्र शेतात आपण रक्ताचं पाणी करतो अन् गारपीठने पिकांचे लाखों रुपयांचे नुकसान होते, तेव्हा आपल्याला वाईट वाटते दुःख होते. स्वतःच्या पोटासाठी खर्च करणार नाही की कुठली हौस मौज करणार नाही. परंतु आपण लग्नात नको त्याठिकाणी वाट्टेल तेवढ्या पैशांची उधळपट्टी करतो या विषयीचे आत्मपरिक्षण मात्र केले जात नाही. तरी आता हुंडा घेणे-देणे पध्दत म्हणावी तेवढी राहिलेली दिसत नाही. आपण जेवढे सुशिक्षित होऊ लागलो आहोत तेवढेच नको त्या प्रथा पध्दतींचा स्वीकार करीत आमच्या पवित्र अशा संस्कृतीला तिलांजली देत आहोत. कारण आम्ही आधुनिकीकरणाकडे जात आहोत.

प्रत्येक शहर व गावक-यांनी सभा घेऊन किंवा वधू-वर त्यांचे परिवार यांनी एकत्र येऊन अशा प्रकारच्या चुकीच्या प्रथा व पध्दतीसह वेळेत लग्न लावले जाणे, डीजे वाद्या ऐवजी पारंपारीक वाद्य, हळदी सोहळ्यातील चुकी प्रकारे. वरातीत महिलांचे नाचणे यासारख्या प्रथा पध्दतींवर निर्बंध घालून आदर्श विवाह पध्दतीनुसार विवाह संस्कार पार पाडणे गरजे आहे.

**राजेंद्र चौधरी.**
**रोझोदा. ता. रावेर. जि. जळगाव.**
**मो. ७७००९८२७६५**

# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज

१४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदरावर महाराणी सईबाई यांच्या पोटी शंभूराजांचा जन्म झाला. शिवरायांसारख्या तेजस्वी सिंहाच्या पोटी तेजस्वी छावा जन्माला आला. आणि सुरू झाला प्रवास एका संकटमय आणि संघर्षमय जीवनाचा. जन्मतःच सईबाई मातोश्रींच्या आजारपणामुळे आईच्या दुधाला पारखे झाले आणि अवघ्या दोन वर्षांचे असताना मातृछत्र हरवले. माँसाहेब जिजाऊंनी माया, प्रेम आणि संस्कार केले. स्वराज्याचे दुसरे छत्रपती घडवण्याची जबाबदारी जिजाऊंनी आपल्या खांद्यावर घेतली. शंभू राजांना आईची कसलीच उणीव भासणार नाही याची सर्वतोपरी खबरदारी जिजाऊंनी घेतली. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी परिस्थितीने त्यांना राजकारणात ओढलं. मिर्झाराजे जयसिंग व दिलेरखानाच्या छावणीत ओलीस बनून राहावं लागलं. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी त्यांना शिवरायांसोबत आग्र्याला जावं लागलं. असं म्हणतात की बाळाचे पाय पाळण्यात दिसतात पण शंभुराजेंच्या बाबतीत ते पाळण्यात तर दिसलेच पण ते पळण्यातही दिसले आणि जिवंतपनी जळण्यातही दिसले. आग्रा - मथुरा - राजगड नुसती धावा धाव कशासाठी तर स्वराज्यासाठी. जिवंतपणी मृत्यूचा अनुभव कशासाठी तर स्वराज्यासाठी. वयाच्या नवव्या वर्षी जिवंतपणी आपल्या निधनाची वार्ता ऐकण्याचा कटू अनुभव घेणारे संभाजी राजे हे जगातील एकमेव राजपुत्र. अन्न, पाणी, विश्रांती, सुख याचा कसलाही विचार न करता दुःखाला पाठीशी टाकत, संकटांना पायाखाली तुडवत स्वराज्य मार्गावरून चालत राहिले. ज्या वयात सुखाची ऊब घेत पांघुरणात लोळत पडायचं त्या वयात शंभूराजे मोघलांच्या धगीत आणि संकटांच्या, वाऱ्या वादळांच्या आगीत होरपळत राहिले व तावून सुलाखून निघाले. खरंतर मोठ्या वटवृक्षाखाली कोणतंही झाड उगवत नाही, उगवलं तर मोठं होत नाही, फुलत नाही, फलत नाही, पण संभाजीराजे उगवले आणि नुसते उगवलेच नाही तर फळाफुलांनी लगडलेला महावृक्ष झाले, कारण शिवराय नावाच्या वटवृक्षाने त्या रोपट्यावर सावली धरलीच नाही तर ऊन, वारा, पाऊस, थंडी, वादळांच्या स्वाधीन केलं, संकटाच्या खाईत लोटलं त्यामुळे त्या वृक्षाची मूळ खोल गेली, पकड घट्ट झाली, फांद्या मजबूत झाल्या आणि एक महावृक्ष साकारला.

हजरजबाबीपणा, प्रसंगावधान, नम्रता, प्रेम , आपुलकी, जिव्हाळा, निर्भीडपणा, एक हळवं आणि झुंजार मन, शस्त्र आणि शास्त्रात पारंगत, अनेक भाषा अवगत असणारे, जिज्ञासू, बुद्धिमान, त्यागी, निर्भय, धाडसी, पराक्रमी हे सगळे अद्वितीय आणि अलौकिक गुण असणारे शंभुराजे गुणसंपन्नतेच्या कसोटीवर खरे उतरले. वयाच्या चौदाव्या वर्षी बुधभूषण सारखा



अद्वितीय ग्रंथ लिहिणारे त्याचबरोबर नखशीख, नायिकाभेद, सातसतक असे एकाहून एक सरस ग्रंथ लिहिणारे शंभुराजे एक प्रतिभासंपन्न लेखक होते. त्यांच्यातील अफाट ज्ञान, बुद्धिमत्ता व प्रतिभा पाहून गागाभट्ट यांनी आपला समयनय हा ग्रंथ शंभूराजांना अर्पण केला.

स्वराज्यात शंभूराजांवर सतत आरोप झाले, त्यांचे विषय घेऊन न्यायनिवाडे उभे राहिले, अनेकदा त्यांना कटकारस्थान्यांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा केलं, सतत ते खरे का खोटे हे पारखलं गेलं, ते हयात असताना आणि नंतरही हे अनेकदा झालं, त्यांच्याबाबत सुडाचे, द्वेशाचे, तिरस्काराचे राजकारण केले गेले पण ते पुरून उरले. त्यांच्यातील तेजाने या सर्वांवर मात केली. आणि सर्वांना दीपवून टाकले. शंभूराजांचे बालपण आणि तरुणपण स्वराज्याच्या पायात पूरलं गेलं म्हणून स्वराज्याच्या गडकोटांना आणि सिंहासनाला भक्कमपणा लाभला. शंभूराजांच्या बालपणापासून त्यांची सगळी वाटचाल मावळ्यांच्या आणि रयतेच्या साक्षीने सुरू होती. त्यामुळे मावळ्यांना आणि रयतेला शंभूराजांच्या डोळ्यात शिवरायांची स्वप्न दिसायची. मावळ्यांचा आणि रयतेचा शंभूराजांवरचा विश्वास कधीच तसूभरही ढळला नाही.

बालपणीच कोवळ्या वयात आईचे सईबाईंचे मातृछत्र हरवले, त्यानंतर आजोबा स्वराज्य संकल्पक शहाजीराजे, आईची कसलीच उणीव भासू न देणाऱ्या आज्जी स्वराज्य जननी जिजाऊ, हिमालयासारखे उत्तुंग कर्तृत्व असणारे वडील, स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, पुतळामातोश्री, सोयरामातोश्री, हंबीरमामांसारखा खंबीर पाठीराखा अशी ही सगळी माणसं सोडून गेली पण रडत न बसता शंभुराजे स्वराज्य रक्षणासाठी तळहातावर प्राण घेऊन रात्रंदिवस लढत राहिले. पर्वता सारखे दुःख पाठीवर घेऊन झुंजत राहिले. हे सगळे कशासाठी तर भूमिपुत्रांच्या स्वराज्यासाठी, सुराज्यासाठी, माय माऊल्यांच्या, रयतेच्या लोककल्याणकारी राज्यासाठी.

शंभुराजांची शिवनिष्ठा आढळ होती, ते शिवविचाराचे कट्टर समर्थक होते, ते शिवनीती, शिवसूत्र आणि शिवधर्माचे वाहक होते. आबासाहेबांचे जे जे संकल्पित ते आम्हा करणे अगत्याचे हे वचन डोळ्यासमोर ठेवून शंभूराजांनी राजा म्हणून नव्हे तर शिवरायांचा उत्तम मावळा म्हणून स्वराज्याचं रक्षण केलं आणि शिवरायांचे संकल्पित पूर्णत्वास नेले. नऊ वर्षांच्या कारकिर्दित अडीच हजार लढाया लढणारा आणि एकाही लढाईत पराभूत न होणारा अजिंक्य योद्धा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. त्यांचे प्रथम तसेच अंतिम ध्येय हे स्वराज्य आणि शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण हेच होते. शंभूराजांच्या कर्तुत्वाने सह्याद्रीची मान उंचावत असे आणि भगव्याचा ऊरही अभिमानाने भरून येत असे.

शंभूराजांनी शिवरायांचे सर्वधर्मसहिष्णुतेचे धोरण अत्यंत प्रखरपणे पुढे चालवले. धर्मामुळे राजा नसतो तर राजामुळे धर्म असतो हा शिवरायांचा विचार त्यांनी कायम ठेवला. शिवरायांनी हिंदू धर्मातून दुसऱ्या धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला व तशी कार्यवाही केली. शिवरायांचं तेच धोरण संभाजी राजांनी पुढे सुरू ठेवलं. स्वराज्यात धर्म एकच स्वराज्य धर्म आणि या स्वराज्य धर्माचा मंत्र सुद्धा एकच रयतेचं कल्याण. जिथे रयतेचं कल्याण असेल तिथे धर्म हा स्वराज्याच्या उंबरठ्याबाहेर असेल आणि जिथे आमच्या रयतेचे सुख असेल तिथे धर्मातील जातीपातीची कल्पना स्वराज्याच्या अंगणाबाहेर असेल असे संभाजी राजे ठणकावून सांगत. अठरापगड जाती धर्माच्या लोकांना एका सूत्रात बांधणारा वारकरी संतांचा विचार आणि शिव विचार शंभूराजांनी आपल्या खांद्यांवरून पुढे वाहिला. शिवरायांनी धर्माच्याच राज्याची स्थापना केली पण या धर्माचा पाया होता लोककल्याण, भयमुक्त आणि आनंदी जीवन, म्हणूनच जातीय धार्मिक विषमतेवर आधारलेल्या धर्माला स्वराज्यात स्थान नाही. आम्ही तेच धर्मपीठ मानतो ज्यात माणसामाणसांना जोडणारी खळ आहे माणसामाणसांना दूर करणारा खल नाही. शिवरायांनी सर्वसामान्य माणसांच्या मानगुटीवर अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धांचं गाठोडं कधीच दिलं नाही. ते सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामगिरीचं ओझं फेकून देऊन परिवर्तनाच्या व प्रगतीच्या मार्गावरून चालायला शिकवलं. धर्मपिठाच्या मान्यतेपेक्षा लोकमान्यता महत्वाची मानली. धर्मपिठापेक्षा जात्यातून बाहेर पडणाऱ्या पिठाला शिवरायांनी जास्त महत्त्वाचं मानलं कारण ते माता माऊलींची ओवी ऐकत बाहेर येतं आणि भुकेल्यांची भूक भागवतं हा शिवविचार होता तो शंभूराजांनी प्राणप्रणाने जपला. एथ वडील जे जे करिती । तया नाम धर्मु ठेवती । तेची येर अनुष्ठीति । सामान्य सकळ ॥ या माऊली ज्ञानोबारायांच्या संत वचनाप्रमाणे किंवा सत्य तोची धर्म । असत्य ते कर्म ॥ आणिक हे वर्म । नाही दुजे ॥ या जगद्गुरु तुकोबारायांच्या संत वचनाप्रमाणे वडिलांचा सत्यधर्म पुढे चालवण्याचे काम छत्रपती संभाजी महाराजांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे वतनदारी बंद करण्याचे धोरण देखील अतिशय प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांनी कायम ठेवले.

जग जिंकण्याचे सामर्थ्य बाळगणारा, अनुभवी, अफाट शक्ती असणारा आलमगीर औरंगजेब जेव्हा फक्त बावीस वर्षांच्या नवख्या राजासमोर हतबल होतो. सर्व शक्ती पणाला लावतो. दिल्ली सोडून स्वतः सगळी फौज घेऊन दख्खनेत येतो. स्वतःच्या डोक्यावरचा किमॉश उतरवतो. शंभूराजांचा पराभव केल्याशिवाय किमॉश डोक्यावर घालणार नाही अशी शपथ घेतो अर्थात सर्वस्व पणाला लावतो तेव्हा शंभूराजेंच्या अफाट आत्मबलाचा अंदाज येतो. जीव धोक्यात असताना देखील स्वराज्याचा खजिना कोठे आहे हे न सांगणारे तसेच स्वराज्याला मदत करणाऱ्या शत्रू पक्षातील सरदारांची नावे स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी न सांगणारे छत्रपती संभाजी राजे तत्त्वनिष्ठ, शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याशी बांधिलकी जपणारे महान राष्ट्रपुरुष ठरतात. मृत्यू समोर दिसत असताना देखील संभाजीराजांनी आपला प्राण वाचविण्यासाठी शिवरायांनी निर्माण केलेलं स्वराज्य औरंगजेबाच्या चरणावर ठेवलं नाही. त्यांनी दिलेलं बलिदान हे केवळ आणि केवळ स्वराज्याहितासाठी आणि स्वराज्यरक्षणासाठीच होतं हे लक्षात येतं. त्यांच्या बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही.

आयुष्यभर चारित्र्यसंपन्न, निर्व्यसनी, निष्कलंक राहुन जिद्द, चिकाटी, सातत्य, दुर्दम्य आत्मविश्वास, प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी, प्रचंड इच्छाशक्ती, जाज्वल्यवृत्ती, मेहनत, संकटांवर थेट चालून जाण्याची हिम्मत अशा गुणांच्या जोरावर राष्ट्रनिर्मिती करून राष्ट्रासाठी बलिदान देणारे प्रजाहितदक्ष, कर्तृत्ववान शंभुराजे आजच्या युवकांसाठी व येणाऱ्या पिढ्यांसाठी कायम स्फूर्तीस्थान व प्रेरणास्थान आहेत त्यांच्या जयंतीदिनी पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

**ह भ प संतोष महाराज डोंगरे**
**जिल्हाध्यक्ष**
**संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष**
**बीड**

# ३१वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन थाटामाटात संपन्न !!

नुकताच ९ व १०मे २०२५ रोजी सातारा जिल्ह्यातील कराड येथे दोन दिवसाचे यशवंतराव चव्हाण साहित्य नगरी पावन भूमी मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ शरद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली "३१वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन" आयोजित करण्यात आले. पहिल्या दिवशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. त्या नंतर कविसंमेलन, चर्चासत्र, कथा कथन, परिसंवाद, ३ पुस्तक प्रकाशन, आणि कविसंमेलन. प्रत्येक सत्रात वेग वेगळे अध्यक्ष व सुत्रसंचलन



आणि मान्यवर उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण स्मृती संदन (टाऊन हॉल) मध्ये बेळगांव आणि गोवा सहीत, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जेष्ठ श्रेष्ठ व नवोदित साहित्यिक- कवी आले होते. मुंबई मधून जेष्ठ कवी शशिकांत सावंत, कवी प्रभू अग्राहरकर, जेष्ठ कवयित्री डॉ उषाराणी गुजराती, जेष्ठ कवयित्री मंदाकिनी भावे, जेष्ठ कवयित्री डॉ अलका नाईक, जेष्ठ कवयित्री सुवर्णाताई पवार, कवी संतोष तावडे, जेष्ठ कवी बाळासाहेब तोरस्कर, आणि शब्दश्री विलास देवळेकर. यांनी आप आपल्या स्वरचित कविता सादर केली. यामध्ये कविता- पोवाडे- लावणी- भावगीत आणि देशभक्ती गीत असे अनेक प्रकार सादर करण्यात आले. पण शब्दश्री देवळेकर यांनी आपली कविता इको साऊंड म्युझिकल सिस्टीम मध्ये सादर केल्याबद्दल, वन्स मोअर ची मागणी आली. पण ६शे च्या वर कवी असल्याने, त्यामुळे वेळे अभावी शक्य नव्हते. त्यांच्या सादरीकरणासाठी, सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उदंड प्रतिसाद व कौतुक मिळाले.

ह्या दोन दिवसाच्या मान्यवरांच्या हस्ते अनेक विविध प्रकारचे पुरस्कार तसेच, सर्व उपस्थित कवी व कवयित्रींना 'सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह' देऊन, सत्कार करण्यात आले. तीन टेबल वर पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध होते. तसेच, काही कवींनी आपले स्वतःचे काव्य संग्रह नवीन- जुन्या ओळखीच्या कवींना भेट देत होते. विचारांची देवाणघेवाण झाली. आणि शेवटी, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ गोरे आणि पदाधिकारी यांच्या विनंतीला मान देऊन शब्दश्री देवळेकर यांनी आपल्या स्टाईलने इको साऊंड म्युझिकल सिस्टीम मध्ये समारोप केला. आणि विशेष म्हणजे, सर्व सारस्वतांचे राहण्याचे तसेच, नाष्टा व जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे आयोजन व नियोजन उत्तम होते. म्हणून आयोजक व सारस्वत यांनी कार्यक्रम 'यशस्वी' झाल्याचे समाधान व्यक्त केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १४ मे २०२५
https://lokaarambh.com



## गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




परम पूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या जन्मदिनी समाजपयोगी कार्याच्या संकल्पनेतून उमरखेड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास नागरिकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमात युवक, युवती, महिला आणि जेष्ठ नागरिकांनी रक्तदान करत सामाजिक जबाबदारी निभावली. “Give Blood Save Life” या घोषवाक्याखाली पार पडलेल्या या उपक्रमात शेकडो रक्तदात्यांनी सहभाग घेतला. रक्तदानानंतर प्रत्येक दात्यास प्रमाणपत्र देण्यात आले. या सामाजिक उपक्रमाबद्दल आयोजकांचे आणि सहभागी रक्तदात्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. समाजसेवेसाठी केलेल्या या योगदानाबद्दल सर्वांचे अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा!

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे यशस्वी आयोजन – बक्षीस वितरणाचा सोहळा संपन्न



प्रतिनिधी मांगकिन्ही (ता.दरव्हा ) | तथागत बुद्ध विहार, मांगकिन्ही येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमात विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. बुद्ध विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेला ग्रामस्थांचा आणि विद्यार्थी वर्गाचा भरघोस प्रतिसाद लाभला. विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे, आयोजक व ग्रामस्थ यांची उपस्थिती लक्षणीय होती. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे विशेष अभिनंदन केले.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त कार्यकारिणीची स्थापना

प्रतिनिधी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी (300वी) जयंतीनिमित्त विशेष कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली आहे. या कार्यकारिणीच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यकारिणीमध्ये पुढील सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे: अध्यक्ष: पवन राजेंद्र तांगडे उपाध्यक्ष: सचिन मारे, साजिद पठाण कार्याध्यक्ष: प्रसाद कुलकर्णी सहकार्याध्यक्ष: अमोल मोदानी सचिव: विजय राऊत सहसचिव: शरद जाधव चिटणीस: कुणाल जगताप सहचिटणीस: सुनील चनवत कोषाध्यक्ष: शरद खांडो सहकोषाध्यक्ष: श्याम दळवे खजिनदार: पंढरीनाथ राठोड सहखजिनदार: पिनू घोडके संघटक: फिरोज पठाण, सोमनाथ तांगडे सहसंघटक: मयूर कुडे प्रसिद्धी प्रमुख: भगवान सोरमारे, अंबादास ऐडेके, सोमनाथ सातपुते या कार्यकारिणीच्या माध्यमातून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची आणि स्मृतीची महती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## रहमानिया उर्दू हायस्कूल, मानोरा – एस.एस.सी. 2025 मध्ये 97.50% उत्तीर्णता, उत्कृष्ट निकालाची नोंद

(जि. वाशिम) | रहमानिया उर्दू हायस्कूल, मानोरा या शाळेने यंदा इ. १० वीच्या (एस.एस.सी. २०२५) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले असून, ९७.५० टक्के उत्तीर्णतेसह शैक्षणिक गुणवत्तेचा उत्तम नमुना सादर केला आहे. एकूण ४० विद्यार्थी नोंदणी केलेल्या पैकी ३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, यातील सर्व ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष बाब म्हणजे, ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे ३ विद्यार्थी आहेत, तर २२ विद्यार्थ्यांनी प्राविण्य (Distinction) मिळवला आहे. १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आणि १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. हा यशस्वी निकाल शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यांचे प्रतीक आहे. रहमानिया उर्दू हायस्कूलच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकवर्गाचे हार्दिक अभिनंदन!

## प्रफुल भाऊ चव्हाण यांची भाजप जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती; अभिनंदनाचा वर्षाव



प्रतिनिधीयवतमाळ | भारतीय जनता पक्षाच्या जिह्लाध्यक्षपदी प्रफुल भाऊ चव्हाण यांची नुकतीच निवड करण्यात आली असून त्यांच्या या नियुक्तीबद्दल पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यवतमाळ येथे आयोजित एका साध्या पण उत्साही कार्यक्रमात प्रफुल भाऊ चव्हाण यांना शुभेच्छा देण्यासाठी पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या नियुक्तीमुळे भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बळकटीला अधिक गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## शेलू ते कारंजा रोडवर अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली



उमेश खंडारे ): शेलू ते कारंजा रस्त्यावर दिवडर गावाजवळ आज एका मालवाहतूक ट्रकला अपघात झाला. रस्त्याच्या वळणावर नियंत्रण सुटल्यामुळे ट्रक थेट रस्त्याच्या कडेला जाऊन धडकला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रक नागपूरकडून कारंजा दिशेने जात असताना हा अपघात घडला. अपघातामुळे काही काळासाठी रस्त्यावर वाहतूक मंदावली होती. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन ट्रक बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वळणाच्या ठिकाणी स्पष्ट सूचना फलक व स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना टळू शकतील.

## शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय, वणीचा ९३% निकाल - जान्हवी बांडे व लोमेश्वरी कोसारकर प्रथम








प्रतिनिधी) शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय, वणी येथील २०२५ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९३ टक्के लागला आहे. शाळेच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या परीक्षेत जान्हवी संतोष बांडे व लोमेश्वरी सुशील कोसारकर यांनी अनुक्रमे ४७९ गुण (९५.८०%) मिळवत संयुक्तरित्या प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्यानंतर रिद्धी अनिल लवंगेवाड हिने ४४६ गुण (८९.२०%) मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या घवघवीत यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच शिक्षकवृंदांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## विदर्भ पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १००%; पुष्पक बळी ९७.६०% गुणांसह प्रथम

/प्रतिनिधी मालेगाव तालुक्यातील उत्कृष्ट निकालांची परंपरा जपणाऱ्या एकमेव सीबीएसई मान्यताप्राप्त शाळा विदर्भ पब्लिक स्कूल, मालेगाव (शेलू फाटा) यांनी सीबीएसई बोर्ड परीक्षेत 2024-25 मध्ये शंभर टक्के निकालाची परंपरा यशस्वीपणे कायम राखली आहे. या वर्षी शाळेतील पुष्पक बळी याने 97.60% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. भक्ती आधव 95.80% सह द्वितीय व श्रावणी आळहत हिने 94.60% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. राहुल भांडुर्गे (93.80%), युक्ती राठोड (93.40%), वैश्नवी बकाळ (92.80%), लामिया मुल्ला (92.20%) आणि अदिती खरात (90.60%) या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एकूण 18 विद्यार्थ्यांनी 80% पेक्षा अधिक गुण मिळवून शाळेचे व तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद व व्यवस्थापन मंडळ यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.




## एस पी बाकलीवाल विद्यालय थेरगाव या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल 90.47 टक्के

/प्रतिनिधी यामध्ये इयत्ता दहावी परीक्षेस एकूण 63 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. यामधून 57 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यसह 24 विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत 24 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. कु.निर्मळ कल्याणी संजय 90.00 प्रथम, कु. निर्मळ वैष्णवी अंगद 88.20 द्वितीय तर कु. गोलांडे



श्रावणी कैलास 86.40 व गोजरे वैष्णवी बापूसाहेब 86.40 गुण मिळवून तृतीय आले आहे. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे माजी मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष श्री. अनिल पटेल, उपाध्यक्ष श्री. सुभाष पटेल, सचिव श्रीमती. रंजना पाटीदार, संचालक श्री. निमेश पटेल, मुख्याध्यापक श्री. सुरेश पाटील, श्री. मनोहर घायाळ आदींनी अभिनंदन केले.

## साखर घेऊन जाणारा ट्रक उलटला; वाहतूक विस्कळीत

मानोरा, दि. १० मे पुसद येथून साखर घेऊन मानोरा येथे येत असलेला ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने मानोरा-बेलोरा मार्गावर उलटला. ही घटना शनिवारी दुपारी घडली. ट्रक भर रस्त्यात आडव्या अवस्थेत पलटी झाल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णतः ठप्प झाली होती. अपघातामध्ये सुदैवाने कोणतीही



जीवितहानी झाली नाही. मात्र ट्रक आडव्या झाल्याने दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व मदतकार्य सुरू केले. सुमारे तासाभरानंतर ट्रक हटवण्यात आला आणि वाहतूक पूर्वपदावर आली. या अपघातामुळे मार्गावरील प्रवाशांना व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

## वारसा साहित्य मंचामार्फत पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : वारसा साहित्यमंचाद्वारे पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दिनांक 25 मे (रविवार) रोजी जिजाऊ मंदिर बाबा पेट्रोल पंपाजवळ, म्हाडा कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. पहिले कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका मा. प्रिया धारूरकर असतील. या कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर येथील ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री भारत सातपुते यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध गझलकार, कवी, संपादक मा. श्री. रज्जाकभाई शेख असतील. या कार्यक्रमासाठी नाशिक येथील सुप्रसिद्ध गझलकार, निवेदक मा. श्री.बाळासाहेब गिरी , तसेच पुणे येथील काव्यवाणी काव्यसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मा. वाणी ताकवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कवी श्री अर्जुन गायकवाड संपादित ‘ वारसा’ या प्रातिनिधिक काव्यसंग्रह तसेच कवी श्री ज्ञानदेव डिघुळे लिखित ‘ आप्पा शब्दांचे दर्पण ‘ या कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. या दोन्ही काव्यसंग्रहाचे निर्मिती काव्यगंध प्रकाशनाने केलेली आहे. याप्रसंगी सर्वंच कवींना




सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लातूर येथील कवी प्रा.डॉ.सुशिल सातपुते करणार आहेत. वारसा साहित्य मंचामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात तसेच विविध साहित्यिक स्पर्धेचे आयोजन केले जाते. या कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी जास्तीत जास्त कवीने नोंदणी करावी व कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन वारसा साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष कवी मा.अर्जुन गायकवाड, उपाध्यक्ष कवी मा.पवन शेळके, सचिव कवी मा.ज्ञानदेव डिघुळे, कवी प्रा. डॉ. सुशिल सातपुते यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कवी श्री अर्जुन गायकवाड ( 7499788620) यांना संपर्क करावा.

## साहेबराव नंदन तात्या यांना वयाच्या बासष्टीत तीसरा जीवन गौरव पुरस्कार



नाशिक [ साहित्य सेवा ] उत्तर महाराष्ट्रातील बहुचर्चित प्रसिद्ध असलेले कवी लेखक गावगाडाकर सगर समाजाचे भूषण गोदाकाठचे खान्देशचे तात्या विविध राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित असलेले साहेबरावजी नंदन उर्फ तात्यासाहेब यांना वयाच्या बासष्टीत तिसऱ्यांदा जीवनगौरव पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी नगर येथील काळीज माझं साहित्य या साहित्य संस्थेच्या नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या ८ जुन २०२५ रोजी राज्यस्तरीय काव्य समेलनात विविध जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते साहेबराव तात्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे नुकतेच संस्थेचे निवडपत्र प्राप्त झाले आहे. या आधी त्यांना मुंबई येथील प्रजासत्ताक अमृत गौरव समिती व वसुनंदिनी फाऊंडेशन जळगाव यांचा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. साहेबराव नंदन तात्या हे नाशिक जिल्ह्यातील ताहाराबादचे रहिवासी, उद्योग व्यवसाया निमित्त नाशिक येथे वास्तव्यास असुन, त्यांच्या नावावर गावगाडा काव्यसंग्रह, परिसस्पर्श कादंबरी / शिवाय सगर रत्न विशेषांक / सगर सेवार्थी अंक / नियमित सगर दिपोत्सव दिवाळी अंक / स्नेहबंध विशेषांक / अनेक कथा लघुकथा

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १४ मे २०२५
https://lokaarambh.com


# हळूहळू खरी माहिती समोर येतेय, पाकिस्तान एअर फोर्सच महाभयंकर नुकसान, अधिकाऱ्यांसह ५० ठार

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तान आणि POK मध्ये घुसून फक्त दहशतवादी तळांवर कारवाई केली. पाकिस्तानी लष्कराने दहशतवाद्यांविरोधातील कारवाई आपल्यावरचा हल्ला मानून भारतावर प्रतिहल्ल्याची चूक केली. त्याची मोठी किंमत पाकिस्तान लष्कर आणि पाकिस्तान एअर फोर्सला चुकवावी लागली आहे. सर्वसामान्य पाकिस्तानी जनतेपासून सत्य लपवून तिथे विजयाचे खोटे ढोल बडवले जात आहेत. पाकिस्तानात किती नुकसान झालय, त्याची आता हळूहळू खरी माहिती समोर येऊ लागली आहे. पाकिस्तानने 7-8 तारखेच्या रात्री 15 आणि 8-9 तारखेच्या रात्री भारताच्या 26 शहरांवर हवाई हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सर्वसामान्य भारतीय नागरिकांसोबत सैन्य तळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. सर्तक असलेल्या भारताच्या तिन्ही सैन्य दलांनी पाकिस्तानचे हे दोन्ही हल्ले यशस्वी रित्या परवतून लावलेच. पण त्यानंतर पाकिस्तानला अद्दल घडवणारी कारवाई केली. 7 ते 10 तारखेदरम्यान भारतीय सैन्य दलांनी जो पराक्रम दाखवला, तो पुढची काही वर्ष पाकिस्तान निश्चित विसरणार नाही. भारताच्या कारवाईत पाकिस्तानच किती नुकसान झालय, त्याची माहिती समोर येऊ लागली आहे. भारताने अत्यंत अचूकतेने पाकिस्तानातील जवळपास डझनभर हवाई तळांवर हल्ला चढवला. यात पाकिस्तान एअर फोर्सच महाभयंकर नुकसान झालं आहे. भारताच्या हल्ल्यात



पाकिस्तानी एअर फोर्सचं 20 टक्के इन्फ्रास्ट्रक्चर नष्ट झालं. यात अनेक पाकिस्तानी फायटर विमान सुद्धा आहेत. अधिकृत सूत्रांच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने हे वृत्त दिलय. वास्तवात हा आकडा मोठा पाकिस्तानच्या सरगोधा आणि भोलारी एअर बेसवर त्यांची F-16 आणि J-17 विमानं तैनात असतात. भारताने पाकिस्तानच्या या दोन्ही एअर बेसच मोठ्या प्रमाणात नुकसान केलय. सूत्रांनी ही माहिती दिली आहे. पाकिस्तानने सध्या त्यांचे 11 सैनिक ठार झाल्याच कबूल केलय. पण वास्तवात हा आकडा मोठा आहे. पाकिस्तानी सैन्य दलांशी संबंधित जवळपास 50 जण या कारवाईत मारले गेले आहेत. यात अधिकारी सुद्धा आहेत. सिंध प्रांतातील जामशोरे येथे असलेल्या भोलारी एअर बेसवरील कारवाईत स्क्वाड्रन लीडर उस्मान युसूफ आणि चार एअरमेन मारले गेलेत. पाकिस्तानची अनेक फायटर विमानं या कारवाईत नष्ट झाली आहेत. पाकिस्तानच्या सैन्य चौक्या पूर्णपणे नष्ट ऑपरेशन सिंदूर अंतर्गत प्रतिहल्ल्याची ही कारवाई करण्यात आली. चकालामधील नूर खान, शोरकोटमधील रफिकी, चकवालमधील मुरीद, सुक्कूर, सियालकोट, पसरुर, च्युनियन, सरगोदा, स्कार्दू, भोलारी आणि जाकोबाबाद या एअर बेसेसवर हा हल्ला करण्यात आला. सॅटलाइट फोटोंवरुन जाकोबाबादच्या शाहबाज एअर बेसवर किती मोठं नुकसान झालय ते सॅटलाइट फोटोंवरुन स्पष्ट झालाय. नियंत्रण रेषा LOC वर दहशतवाद्यांना लपवण्यासाठी बनवलेले बंकर्स आणि पाकिस्तानच्या सैन्य चौक्या पूर्णपणे नष्ट करण्यात आल्या आहेत. सूत्रांनी ही माहिती दिली. पाकिस्तान सैन्य आणि एअर फोर्स मिळून त्यांचे जवळपास 50 जण ठार झाले आहेत.

## फोन टॅपिंग होत असल्याने राज्यातील अधिकारी फोन उचलत नाही: राष्ट्रवादी शरद पवार गटातील बड्या नेत्याचा खळबळजनक आरोप

राज्यात फोन टॅपिंगचा विषय पुन्हा चर्चेत येणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. राज्यातील अधिकाऱ्यांच्या फोन टॅपिंगच्या घटना घडत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला. फोन टॅपिंगच्या प्रकारामुळे अर्ध्या महाराष्ट्रातल्या अधिकारी हे व्हाईस कॉलवर असतात. सचिव, अधिकारी अथवा पोलीस अधिकारी असो कॉल केल्यावर फोन उचलत नाही, या शब्दात एकनाथ खडसे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. एकनाथ खडसे यांनी म्हटले की, पोलीस अधिकारी असतील, तहसीलदार असो किंवा इतर उच्च अधिकारी यांना फोन केला की ते फोन घेत नाहीत.



त्यांचे परत उत्तर सुद्धा येत नाही. अनेक अधिकाऱ्यांना फोन केल्यावर मी व्हिसीमध्ये आहे. बैठकीमध्ये आहे, असे सांगितले जाते. मात्र दिवसभर बैठका चालतात का? असा सवाल एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे. लाडक्या बहिणींना 2100 रुपये देऊ, अशी घोषणा सरकारने केली. मात्र, अजितदादा आता म्हणतात, अशी घोषणा कोणी केली, त्यावर बोलताना एकनाथ खडसे म्हणाले, सरकार आपल्या शब्दापासून मागे जात आहे. 2100 रुपये तर लांब राहिले 1500 रुपये सुद्धा वेळेवर मिळत नाही. राज्य दिवाळखोरीवर आले आहे. कर्जबाजारी झाले आहे. 46 हजार कोटी रुपये लाडक्या बहिणी योजनेसाठी लागतात. त्याचा परिणाम इतर योजनांवर झाला आहे. राजीव गांधी योजना, गोपीनाथ मुंडे कृषी योजनेचे पैसे सहा महिन्यांपासून मिळत नाही. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. त्यामुळे सरकारची दिवाळखोरी समोर आली आहे, असे एकनाथ खडसे यानी म्हटले आहे.

## आनंदवार्ता, पाऊस लवकरच भेटीला, आता कुठे ठोकला मुक्काम, केरळमध्ये

देशात लवकरच मान्सून धडक देणार आहे. केरळ मार्गाने महाराष्ट्रात मान्सूनची आनंददायी एंट्री होईल. मे महिन्यात होरपळून निघाल्यानंतर अबालवृद्धांसह सर्वांनाच पावसाची ओढ लागते. पण गेल्या काही दिवसांपासून राज्यावर आभाळमाया आहे. त्यापूर्वी सूर्य कोपला होता. गेल्या दोन-तीन दिवसांपासून अवकाळी पावसाने काही जिल्ह्यांना धो धो धुतले. तर आज ही काळ्या ढगांनी आभाळ भरून गेले आहे. त्यामुळे उन्हाच्या झळा कमी झाल्या आहेत. तापमानात घट झाली आहे. आता कुठे आहे मान्सून? केरळमध्ये कधी टाकणार राहुटी?हवामान विभागाचा अंदाज काय? यंदा मान्सून लवकर दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या (IMD) अंदाजानुसार, यंदा मान्सून केरळमध्ये 27 मे रोजीच दाखल होणार आहे. सर्वसाधारणपणे 1 जूनपासून मान्सून सक्रिय होतो. पण यंदा नेहमीच्या तुलनेत मान्सून पाच दिवस अगोदरच तळ ठोकणार आहे. त्याचे आगमन लांबणार नाही तर तो वेळेआधी प्राणी, निसर्गाला सुखावणार आहे.

## साहेबराव संभाजी इंगळे यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील ज्येष्ठ नागरिक कै.साहेबराव संभाजी इंगळे वय वर्षे ६० यांचे वृद्धापकाळाने दि.१३-मे रोजी दुपारी ३:३० वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.१४-मे रोजी दुपारी १ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.कै.साहेबराव संभाजी इंगळे त्याच्या पश्चात पत्नी तीन मुले दोन मुली नातू असा परिवार आहे. उमरा येथील माजी ग्रामपंचायत सदस्या श्रीमती सुमनबाई साहेबराव इंगळे यांचे पती तर परमेश्वर इंगळे,नवनाथ इंगळे,पंजाब इंगळे यांचे ते वडील होत.

## भाजी मंडईत महागाईचा तडका, फरसबी, गवार शंभरी पार,


गेल्या काही दिवसांपासून महागाई सातत्याने वाढत आहे. त्यातच आता सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठा फटका बसणार आहे. महाराष्ट्रात झालेल्या अवकाळी पावसाचा फटका आता थेट ग्राहकांना बसला आहे. सध्या भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. फरसबी, शेवग्याच्या शेंगा, गवार आणि मटार यांसारख्या भाज्यांची किंमत शंभरी पार गेली आहे. त्यामुळे गृहिणींचे बजेट कोलमडले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सध्या महाराष्ट्रात अवकाळी पावसामुळे भाजीपाल्याचे दर गगनाला भिडले आहेत. अनेक भाज्या या शंभरी पार गेल्या आहेत. यामुळे गृहिणींचे कंबरडे मोडले आहे. सध्या लाल भोपळ्याव्यतिरिक्त इतर अनेक भाज्यांचे दर ५० रुपयांपेक्षा जास्त आहेत. यामुळे दरवाढीमुळे ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण पाहायला मिळत आहे. अवकाळी पावसामुळे भाज्यांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. ज्यामुळे दरात वाढ झाली आहे. भाज्यांचे वाढलेले दर (किलोमध्ये) फरसबी: १६० रुपये गवार: १६० रुपये तोडली: १६० रुपये पापडी:



१२० रुपये मटार: १६० रुपये शिमला मिरची: १६० रुपये भेंडी: ८० रुपये बीट: ६० रुपये लिंबू: २० रुपयाला ३ नग गोकुळ दुधाच्या दरात वाढ तर दुसरीकडे गोकुळ दुधाच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यानुसार, पुणे आणि मुंबईत म्हशीचे दूध प्रतिलिटर ७४ रुपये, तर उर्वरित महाराष्ट्रात ६८ रुपये प्रतिलिटर दराने विक्री केले जात आहे. तसेच गायीच्या दुधातही २ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबई-पुण्यात ५८ रुपये आणि उर्वरित राज्यात ५० रुपये प्रतिलिटर दर पाहायला मिळत आहेत. बसचे तिकीट दर दुप्पट एवढंच नाही तर सर्वसामान्यांना आणखी एक मोठा आर्थिक झटका बसला आहे. बेस्ट प्रशासनाने बसचे तिकीट दर दुप्पट केले आहेत. यामुळे मुंबईकरांच्या प्रवासाचा खर्च महागला आहे.

# भारताचा पाकला मोठा झटका, सिंधूचं पाणी मिळणार नाहीच, अधिकृत भूमिका समोर

गेल्या काही दिवसांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध कमालीचे ताणले आहेत. सध्या या दोन्ही देशांत शस्त्रसंधी झालेली असली तरी पहलगाम हल्ल्यानंतर भारताने तसेच पाकिस्ताने एकमेकांच्या विरोधात घेतलेले निर्णय कायम आहेत. असे असतानाच आता भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानबाबतच्या धोरणावर अधिकृत भूमिका सांगितली आहे. सिंधू जलवाटप कराराला देण्यात आलेली स्थगिती कायम राहील, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने नेमकं काय सांगितलंय? एक चांगली भावना तसेच मैत्रिपूर्ण संबंधाला समोर ठेवून सिंधू जलवाटप करार करण्यात आला होता. गेल्या अनेक दशकांपासून दहशतवादाला खतपाणी घालून पाकिस्तानने मात्र या धारणाले हरताळ फासला आहे. त्यामुळे सीसीएसच्या निर्णयानुसार सीमेपलिकडच्या दहशतवादाला पाकिस्तान जोपर्यंत संपवत नाही, तोपर्यंत सिंधू जलवाटप करार स्थगितच राहील, असं



पाकला सिंधूचं पाणी नाहीच, भारताची अधिकृत भूमिका समोर!

परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टपणे सांगितलं आहे. गोळीचं उत्तर गोळीनंच देऊ तसेच, पाकच्या गोळीचं उत्तर आम्ही गोळीनंच देऊ. भारताने पाकमधील तळांना टार्गेट केलं. 10 मे रोजी पाकिस्तानचे हवाई तळ उद्ध्वस्त केले. हवाई तळ नेस्तनाबूत झाल्यावर पाक नरमला. पराभव झाला तरी ढोल वाजवणं ही पाकिस्तानची सवय आहे, असंदेखील भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानला सुनावलं आहे. भारताच्या भूमिकेचा नेमका अर्थ काय? भारताने पाकिस्तानसोबतच्या सिंधू जलवाटप करारावरील स्थगिती कायम राहील अशी भूमिका घेतली आहे. तसेच पाकिस्तान जोपर्यंत त्यांच्या देशात पोसला जाणारा दहशतवाद संपवणार नाही, तोपर्यंत या कराराला स्थगिती कायम राहील असंही परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे. म्हणजेच आता पाकिस्तानला सिंधू जलवाटप कराराअंतर्गत भारतातून जाणाऱ्या नद्यांचं पाणी हवं असेल तर अगोदर या देशाला त्यांच्या भागातील दहशतवादाला संपवावं लागणार आहे. सीमाभागात असलेल्या दहशतवादी तळांना नष्ट करावं लागणार आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने काय निर्णय घेतला होता? पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली होती. भारताने तत्काळ प्रभावाने सिंधू जलवाटप कराराला स्थगिती दिली होती. तसेच भारतात व्हिसावर आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर सिंधूचे पाणी रोखल्यास आम्ही त्याला युद्ध छेडण्याची क्रिया समजू अशी पोकळ धमकी पाकिस्ताननं दिली होती. त्यानंतर दोन्ही देशांतील वाद वाढत गेला. भारताने पुढे ऑपरेशन सिंधू राबवून पहलगाम दहशतवादी

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com